**MHRG120001552013**

**R.C.S./1300038/2013**
**Janardan Kabukar Vs. Durga Kabukar etc. 6**

**निशाणी क्र. ७६ कडील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ नुसार दाव्यात दुरुस्ती करण्यासाठी दिला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, वादीने सदर दावा वाटपाकरीता दाखल केला होता, दाव्यात आवश्यक व्यक्तींना व वाटपाच्या सर्व मिळकती समाविष्ट न केल्यामुळे दिनांक २२.१२.२०१६ रोजी दावा फेटाळण्यात आला होता. वादीने त्याविरूध्द जिल्हा न्यायालय रायगड–अलिबाग येथे दिवाणी अपील ८/२०१७ दाखल केले होते जे दिनांक १२.०६.२०२५ रोजी मंजूर करण्यात आले. सदर न्यायनिर्णयाव्दारे सदरचा दावा पुन्हा आवश्यक पक्षकार व वाटपाच्या अन्य मिळकती दाव्यात समाविष्ट करून पुन्हा पुरावा घेवून निर्णयाकरीता मा. जिल्हा न्यायालयाकडून या न्यायालयात पाठविण्यात आला आहे.

२. वादींचे पुढे कथन आहे की, दाव्यातील प्रतिवादी क्र.१ मयत झाली असून तिचे वारस प्रतिवादी नं.२ ते ६ यापूर्वीच अभिलेखावर आहेत. त्यामुळे दाव्याच्या सरनाम्यात प्रतिवादी नं.१ मयत तर्फे प्रतिवादी नं.२ ते ६ यांना समाविष्ट करण्यात येवून तशी दुरूस्ती करण्यात यावी. प्रतिवादींनी त्याच्या कैफियतमध्ये मौजे मजगांव ता.मुरूड गट नं.२२२ तसेच घर क्र. २५९ब या मिळकती वडीलोपार्जीत असल्याचे कथन केले असल्याने त्या देखील दाव्यात समाविष्ट करणे आवश्यक आहे. सबब दावा कलम ३ मधील मिळकतीच्या वर्णनामध्ये अ.क्र.२ नंतर अ.क्र.३ म्हणून अर्जात नमूद गट नं.२२२ व घर क्र. २५९ब संबंधीचा मजकूर दाव्यात दुरूस्तीव्दारे सामील करण्यास परवानगी देण्यात यावी.

३. वादींनी पुढे विनंती केली आहे की, गट क्र. २२२ मिळकतीच्या सातबारामध्ये इतर नावे असल्याने त्यांचा दावा मिळकतीशी संबंध नसला तरी त्यांना दाव्यात पक्षकार करणे आवश्यक आहे. त्यामुळे दाव्याच्या सरनाम्यात प्रतिवादी क्र.७/५ संपल्यानंतर अर्जात नमूद प्रतिवादी क्र.८ ते १३ यांचे संबंधीचा मजकूर दाव्यात दुरूस्तीव्दारे सामील करण्यास परवानगी देण्यात यावी. वादी दाव्यात प्रतिवादी क्र.८ ते १३ यांचा दावा मिळकतींशी कोणताही हक्कहितसंबंध नसल्याचा ठराव करून मागत आहे. तरी दाव्याच्या सरनाम्यात कलम ७ संपल्यानंतर अर्जात नमूद ७/१ प्रमाणे दुरूस्ती, दावा कलम ८अ संपल्यानंतर अ/१ अशी अर्जात नमूद दुरूस्ती, दावा कलम ८ ब मध्ये प्रतिवादी क्र.१ ऐवजी 'सर्व प्रतिवादींकडून' अशी दुरूस्ती करण्यास परवानगी देण्यात यावी.

४. प्रतिवादी क्र. २ ते ६ यांनी सदर अर्जास म्हणणे देऊन हरकत घेतली की, वादी एकाच अर्जात वेगवेगळ्या दुरूस्त्या करून मागत आहे, तसेच अर्जातील कथने स्वतंत्ररित्या नाहीत. मा. जिल्हा न्यालयाचे आदेशानुसार दुरूस्ती करायची असली तरी तशी दुरूस्ती ही स्वतंत्रपणे केल्यास तरतुदीनूसार योग्य झाले असते. सबब अर्जाला जास्तीत जास्त खर्च आकारण्यात यावा. प्रतिवादी क्र. ७/१ ते ७/५ यांनी निशाणी ९१ कडे पुरसिस देवून प्रतिवादी क्र. २ ते ६ यांचे म्हणणे स्वीकारले आहे. प्रतिवादी क्र. ८ ते १३ यांनी असे म्हणणे दिले की, प्रतिवादी क्र. २ ते ६ यांचे म्हणणे त्यांच्यासाठी वाचण्यात यावे.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुत दाव्यातील न्यायनिर्णय दिनांक २२.१२.२०१६ विरूध्द वादीने मा. जिल्हा न्यायालयात अपील क्र. ८/२०१७ दाखल केले होते. सदर अपील क्र. ८/२०१७ मध्ये मंजूर होवून प्रस्तुत दावा दिनांक ०३.०९.२०२५ रोजी पुन्हा या न्यायालयाकडे सुनावणीसाठी परत पाठविण्यात आला आहे. अपिलातील अंतिम आदेशात अ.क्र. ४ मध्ये वादीला घर क्र. २५९ब, गट क्र.२२२ व इतर मिळकती दाव्यात सामील करण्यास तसेच गट क्र.२२२ च्या साताबारा उता–यात नाव असणा–या व्यक्तींना प्रतिवादी म्हणून दाव्यात दुरूस्तीव्दारे सामील करण्यास परवानगी देण्यात आली आहे. प्रस्तुतचा दावा वाटपाकरिता व ठरावाकरिता असून उभय पक्षांचे अचलमालमत्ते संबंधीचे अधिकार दाव्याचा विषय आहे. प्रस्तुत अर्जातील दावा दुरूस्तीची मागणी अपील क्र. ८/२०१७ मधील मा. जिल्हा न्यायालयाचे आदेशास अनुसरून असल्याने वादींचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. करीता मी खालील आदेश पारित करतो –

## आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्ज निशाणी ७६ मंजूर करण्यात येत आहेत. |
| २. | वादी यांनी प्रस्तूत आदेशापासून १४ दिवसाच्या आत वाद पत्रामध्ये अर्जात नमूद केल्याप्रमाणे दाव्याच्या सरनाम्यात प्रतिवादी नं.१ मयत तर्फे प्रतिवादी नं.२ ते ६, दाव्याच्या सरनाम्यात प्रतिवादी क्र.७/५ संपल्यानंतर प्रतिवादी क्र.८ ते १३ यांचे संबंधीचा मजकूर, दावा कलम ३ मधील मिळकतीच्या वर्णनामध्ये अ.क्र.२ नंतर अ.क्र.३ म्हणून गट नं.२२२ व घर क्र. २५९ब संबंधीचा मजकूर, दाव्याच्या सरनाम्यात कलम ७ संपल्यानंतर ७/१ प्रमाणे दुरूस्ती, दावा कलम ८अ संपल्यानंतर अ/१ व दावा कलम ८ ब मध्ये प्रतिवादी क्र.१ ऐवजी 'सर्व प्रतिवादींकडून' अशी दुरूस्ती करावी व दुरुस्ती वाद पत्र सादर करावे. |

GHANSHAM RAMLAL TIWARI
Digitally signed by GHANSHAM RAMLAL TIWARI
Date: 2026.01.22 11:17:06 +0530

( घन:शाम रा.तिवारी )
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मुरूड

दिनांक : २१–०१–२०२६